क्र. सापृवि/गट-८/एकका/न.क्र.१४७/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्प्लेनेड बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई क्र. ४०० ०१९.

दिनांक: १५/१२/१९९३.

परिपत्रक क्र.४४३ [एकका] दि. १५.१२.१९९३.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सेवा विनियम क्र. ११[क] प्रमाणे थेट भरती अथवा पदोन्नतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना, सुरुवातीस एक वर्षाच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन ठेवणे आवश्यक आहे. परिवीक्षा कालावधी आणखी एक वर्षापर्यंत वाढविण्याची सुध्दा तरतूद आहे. सेवा विनियम क्र.११ [ग] प्रमाणे परिवीक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण केल्यानंतर परिवीक्षाधीन व्यक्तीची नियुक्ती कायम किंवा स्थानापन्न म्हणून करता येते. परिवीक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण केला आहे किंवा काय हे ठरविण्याकरिता सक्षम अधिकारी अजूनपर्यंत वार्षिक गोपनीय अहवालाचा उपयोग करीत असत. याबाबतीत प्रशासकीय कारणास्तव आता असे ठरविण्यात आलेले आहे की, परिवीक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण केला आहे किंवा काय हे ठरविण्याकरता सक्षम अधिकाऱ्यांनी यापुढे गोपनीय अहवालाचा आधार न घेता, परिवीक्षाधीन व्यक्तीचे काम व वर्तणूक या संबंधीच्या अहवालाचा उपयोग करून निर्णय घ्यावा. यापुढे परिवीक्षाधीन व्यक्तीचे कायम करण्याचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्रात माहिती भरून सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावेत. सर्व संबंधितांनी वरील कार्यपध्दतीची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

हे परिपत्रक सदस्य/सचिव ह्यांच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात आले आहे.

संचालक [कर्मचारीवर्ग].

जोडपत्र :- वरील प्रमाणे.

प्रति,
प्रेषण यादी प्रमाणे.

गोपनीय :

दिनांक :-

## : प्र प त्र :

[ कायम करण्याचा प्रस्ताव ]

| | | |
|---|---|---|
| १] | कर्मचा-याचे नांव | : |
| २] | पदनाम | : |
| ३] | धारण केलेल्या पदाची वेतनश्रेणी व दरमहा वेतन. | : |
| ४] | कोठे काम करतात | : |
| ५] | ज्या कार्यालयीन आदेशाखाली नेमणूक/बढती झाली त्याचा क्रमांक व दिनांक. | |
| ६] | सध्या धारण केलेल्या पदावर नियुक्ती झाल्याची तारीख. [म्हणजे पदाचा कार्यभार ग्रहण केल्याची तारीख]. | : |
| ७] | परिवीक्षा कालावधी पूर्ण करण्याची तारीख. | : |
| ८] | परिवीक्षा कालावधीत घेतलेल्या बिनपगारी रजेचा कालावधी. [असल्यास]. | : |
| ९] | मंडळाच्या सेवेकरीता शारिरीक दृष्टया योग्य ठरविले आहे किंवा नाही. | : |
| १०] | कोणत्या तारखेपासून कायम करणे आवश्यक आहे. | : |
| ११] | कर्मचा-याने एखादी विभागीय परिक्षा उत्तीर्ण करणे जरुरी आहे का ? तसे असल्यास त्याने ती उत्तीर्ण केली आहे का ? केंव्हा ? | : |

१२] मराठी परीक्षा उत्तीर्ण केली आहे का किंवा ती उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविली आहे का ?

१३] मूळ पदावर कायम झाले आहेत का?

१४] त्यांचे चारित्र्य आणि पूर्वचरित्र पडताळले आहे का व ते समाधानकारक आढळले किंवा कसे ?

१५] कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध एखादी शिस्तभंगाची कार्यवाही चालू आहे कां अथवा तसा प्रस्ताव आहे का ?

सामान्य प्रशासन विभाग प्रमुख

<u>नियंत्रण अधिकाऱ्यांकरिता</u> :-

१६] परिवीक्षा कालावधीत कर्मचाऱ्याचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे काय ?

१७] परिवीक्षा कालावधी संपवून कर्मचाऱ्यास कायम करावे काय ?

नियंत्रण अधिकाऱ्याची सही
नाव व हुद्दा.

<u>सक्षम अधिकाऱ्याकरिता</u> :-

१८] कायम करण्यास मंजूरी दिली किंवा नाही.

१९] मंजूरी न दिल्यास पुढील कार्यवाहीचे आदेश काय आहेत ?

सक्षम अधिकाऱ्याची सही
नाव व हुद्दा.